MHPU250018832025

फौ. कि. अर्ज नं. ३५०/२०२५
सुविधा लोहोट वि. अभिषेक लोहोट

**निशाणी क्र. १९ खालील आदेश**
**( पारीत दिनांक ११/०३/२०२६)**

**०१.** हया अर्जाद्वारे जाबदेणार हयांनी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फी आदेश सेट असाईड करण्याची विनंती केली आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जदार हयांनी हे प्रकरण वगळता पी.डब्लू.डी.व्ही. नं. ५४१/२०२२ हे प्रकरण दाखल केले असून त्या प्रकरणात देखील पोटगीची मागणी केलेली आहे. दिनांक २३.०९.२०२५ अर्जदार हयांनी हया प्रकरणात तडजोड होणार आहे असे सांगुन एक तडजोड पुरशिस दाखल केली होती. त्यासोबत दिनांक १२.११.२०२५ व २५.११.२०२५ रोजी देखील तडजोड पुरशिस दाखल करुन हे प्रकरण आपापसात तडजोड करणार आहे व लोक–अदालतमध्ये ठेवण्यात यावे, अशी मागणी केली होती. त्या अनुषंगाने हे प्रकरण दिनांक १३.१२.२०२५ रोजी लोक–अदालत समोर ठेवले होते. अर्जदार हिने मे. सर्वोच्च न्यायालयात स्पे. लिव्ह पिटीशन दाखल केले होते. त्या प्रकरणात देखील अर्जदार हिने मेडीएशनला ठेवण्यात यावे, अशी विनंती केली होती. त्यानुसार दिनांक १८.१०.२०२५ रोजी हे प्रकरण मेडीएशनला पाठविण्याबाबत आदेश पारित झाले. अर्जदार ही तिचे व जाबदेणार हयांचे वाद आपापसात मिटविणार असल्याचे वारंवार भासवित होती. जाबदेणार हा कामानिमित्त UK ला राहतो. तरी देखील हया प्रकरणात दिनांक २८.११.२०२५ रोजी जाबदेणार हयांनी त्यांच्या वकिलांमार्फत वकिलपत्र दाखल केले होते. परंतू, हया प्रकरणात जाबदेणार हयांना आजतागायत E–filing चा Online Access न मिळाल्याने हया प्रकरणातील कोणतीही कागदपत्र मिळालेली नाहीत. त्यामुळे जाबदेणार हयांना त्यांचे म्हणणे मांडणे शक्य झाले नाही. जाबदेणार हयांना त्यांचे म्हणणे मांडायचे आहे. त्यांना म्हणणे मांडण्याची संधी न मिळाल्यास जाबदेणार हयांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल.

**०२.** अर्जदार हिने तिचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, पी. डब्लू.डी.व्ही. नं. ५४१/२०२२ मध्ये तडजोडी बद्दल संयुक्तीक पुरशिस देण्यात

आलेल्या आहेत. कारण अर्जदार हिचे नेहमीच समजूदारीचे व आपपसात मिटविण्याबाबतची भुमीका राहिलेली आहे. परंतू, जाबदेणार UK येथे नोकरी निमित्ताने निघून गेला असून प्रत्येक तारखांना त्याचे आई – वडील हजर राहतात. आपसातील तडजोडीबाबत वडीलच हजर राहतात. आपसातील तडजोडीबाबत जाबदेणाराची आई – वडील तसेच त्यांचे वकिल व अर्जदाराचे वकिल हयांचेमध्ये २–३ वेळी कोर्ट आवारातच बैठका झाल्या. परंतू, जाबदेणाराच्या आई–वडीलांनी कोणतीही ठोस भुमीका घेतलेली नाही. ' आम्ही मुलाला विचारतो व मग काय ते सांगतो ', असे उत्तर जाबदेणाराचे आई – वडील प्रत्येक वेळी देत राहिले. म्हणून पी. डब्लू.डी.व्ही. नं. ५४१/२०२२ मध्ये अद्याप कोणतीही तडजोड होऊ शकलेली नाही. असे असतांना हया अर्जामध्ये जाबदेणारांतर्फे वेगळाच मजकूर लिहीण्यात आलेला आहे. त्यामुळे तो मजकूर अर्जदार हिला मान्य नाही. जाबदेणार हयांना हया अर्जाची माहिती होऊनही त्यांनी फार उशीरांनी हा अर्ज त्यांच्या वकिलांनी त्यांचे सहीने दिलेला आहे. हयावरुन हया अर्जाचा Access घेण्याकामी जाबदेणाराकडून व त्याच्या वकिलांकडून वेळाकाढुपणा केलेला आहे. त्यामुळे निष्कारण कोर्टाचा मौल्यवान वेळ वाया गेला असून अर्जदाराची उपासमार वाढत गेली आहे. त्यामुळै वरील वस्तुस्थीतीचा व न्यायाच्या दृष्टीने विचार करुन जाबदेणाराचा अर्ज जास्तीत जास्त कॉस्ट करुन मंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

०३. अर्जदार हयांचे वकिल श्री सी. एस. डहाळे व जाबेदणार हयांचे वकिल श्री एस. एस. सातव हयांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**०४.** प्रकरण पाहिले असता असे दिसून येते की, जाबदेणार हयांनी मुदतीत त्यांचे म्हणणे दाखल केले नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द दिनांक ०९.१२.२०२५ रोजी एकतर्फा आदेश पारित झालेला आहे. त्यानंतर त्यांच्याविरुध्द अंतरिम पोटगी देण्याबाबत आदेश सुध्दा पारित करण्यात आलेला आहे. आता जाबदेणार हयाला त्याचे म्हणणे दाखल करायचे आहे. खटला गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी जाबदेणार हयाला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. मात्र जाबदेणार हयाने हा अर्ज दाखल करण्यास विलंब केल्यामुळे त्याच्यावर काही खर्च बसवून ती रक्कम अर्जदारास देणे योग्य होईल. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

. अर्ज जाबदेणार हयाने अर्जदारास खर्चाची रक्कम **२,०००/–** रुपये देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

. जाबदेणार हयाने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम न दिल्यास आदेश रद्द समजण्यात यावा.

Digitally signed by ANANT HIMMATRAO BAJAD
Date: 2026.03.11 11:24:02 +0530

(अनंत हिम्मतराव बाजड)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., जुन्नर

जुन्नर
दिनांक –११/०३/२०२६